# कार्यावली

## सोमवार, दिनांक २७ फेब्रुवारी, २०२३ रोजी सकाळी ११.०० वाजता मुंबई येथील विधान भवनात सुरू होणाऱ्या महाराष्ट्र विधानपरिषदेच्या सन २०२३ च्या प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशनाची कार्यावली.

**एक** : राज्यपालांचे अभिभाषण.

**दोन** : राज्यपालांच्या अभिभाषणाची प्रत सभागृहासमोर ठेवणे.

**तीन** : राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल आभार प्रदर्शनाचा प्रस्ताव.

**चार** : उप सभापतींनी, सभापती-तालिका नामनिर्देशित करणे.

**पाच** : प्रश्नोत्तरे.

**सहा** : अध्यादेश सभागृहासमोर ठेवणे.

**सात** : राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा.

**आठ** : सन २०२३-२०२४ चा अर्थसंकल्प सादर करणे व त्यावर सर्वसाधारण चर्चा करणे.

**नऊ** : सन २०२२-२०२३ च्या पुरवणी मागण्या सादर करणे व त्यावर चर्चा करणे.

**दहा** : पंचायती राज समितीचे अहवाल सादर करणे.

**अकरा** : विधानपरिषद आश्वासन समितीचा अहवाल सादर करणे.

**बारा** : मंत्र्यांनी कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे.

**तेरा** : शासकीय विधेयके.

**चौदा** : इतर शासकीय कामकाज ज्याची सूचना नंतर देण्यात येईल.

**पंधरा** : शोक प्रस्ताव.

**सोळा** : इतर प्रस्ताव.

**सतरा** : तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबींवर अल्पकालीन चर्चा- म.वि.प.नियम ९७ अन्वये

**अठरा** : तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबींकडे मंत्र्यांचे लक्ष वेधणे - म.वि.प.नियम १०१ अन्वये.

**एकोणीस**: **अशासकीय विधेयके – विचारार्थ –**

१ **सन २०२१ चे वि.प.वि. क्रमांक २ –** महाराष्ट्र राज्य विशेष मागास प्रवर्ग-अ (एसबीसी-ए) करिता (राज्यातील शैक्षणिक संस्थांमधील जागांच्या प्रवेशाचे आणि राज्याच्या नियंत्रणाखालील लोकसेवांमधील नियुक्त्यांचे किंवा पदांचे) आरक्षण विधेयक, २०२१ - **श्री.कपिल पाटील, वि.प.स.यांचे.**

२ **सन २०२१ चे वि.प.वि. क्रमांक ७ -** महाराष्ट्र धर्म द्वेषास आणि प्रेषित, पैगंबर व धर्मस्थाने यांची विडंबना करण्यास प्रतिबंध करण्यास विधेयक, २०२१ - **श्री.कपिल पाटील, वि.प.स.यांचे.**

**वीस : अशासकीय ठराव (म.वि.प. नियम १०२) -**

**श्री. विलास पोतनीस वि.प.स. यांचे ठराव क्रमांक १, २, ३, ४ व ५**

(१) “राज्यातील खेळाडूंची राष्ट्रीय स्तरावर होत असलेली असमाधानकारक कामगिरी लक्षात घेता क्रीडा क्षेत्राचा सर्वांगीण विकास होण्याकरिता व दर्जेदार खेळाडू निर्माण करण्यासाठी तालुकास्तरावर क्रीडा प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्यात यावीत, त्यासाठी प्रशिक्षित मार्गदर्शक नेमण्यात यावेत, अशा केंद्रांना अद्ययावत साहित्य व आर्थिक सहाय्य देण्यात यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.”

(२) “राज्यात सर्व शासकीय तसेच निमशासकीय कार्यालयात आणि सर्व स्तरावरील न्यायालयात, राज्याच्या एकंदरीत शासकीय व्यवहारांमध्ये मराठीचा १०० टक्के वापर होण्याच्या दृष्टीने आवश्यक ती उपाययोजना करण्याची जबाबदारी राज्य शासनाने मराठी भाषा विभागाकडे सोपवावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.”

(३) “राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांचे वाढते प्रमाण, नोकरी व रोजगाराअभावी तरुणांमध्ये निर्माण झालेले वैफल्य, शासनाने बंद केलेला सुशिक्षित बेरोजगार भत्ता, रोजगाराच्या भाग भांडवलासाठी बँकांसारख्या आर्थिक संस्थांकडून येणाऱ्या अडचणी, या बाबी विचारात घेता बेरोजगारांच्या समस्या सोडवण्यासाठी व गरीब कुटुंबातील व्यक्तींना रोजगार मिळविण्याच्या दृष्टीने एक सक्षम व स्वतंत्र यंत्रणा स्थापन करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.”

(४) “राष्ट्रीय स्तरावर भारतीय प्रशासकीय सेवा, भारतीय पोलीस सेवा व तत्सम विविध स्पर्धा परीक्षांमध्ये उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये इतर राज्याच्या तुलनेत महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांचे अत्यल्प प्रमाण लक्षात घेता हे प्रमाण अधिकतम वाढविण्यासाठी व उमेदवारांची अद्ययावत व योग्य पद्धतीने पूर्वतयारी करून घेण्यासाठी राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात किमान एक प्रशासकीय सेवा प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्याचे दृष्टीने आवश्यक ती उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.”



(५) “देशाला स्वातंत्र्य मिळण्याकरिता लढा देवून त्यासाठी काळ्या पाण्याची शिक्षा भोगून जनतेला मातृभूमी प्रेमाची ज्वलंत विचारसरणी देणारे व क्रांतिकारकांचे प्रेरणास्थान असलेले स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांना मरणोत्तर “भारतरत्न” प्रदान करण्याबाबत राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रह धरावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.”

**श्री. सुनिल शिंदे वि.प.स. यांचे ठराव क्रमांक ६, ७, ८, ९ व १०**

(६) “राज्यात मुंबईसह इतर शहरांतील सदनिकांच्या किंमतीमध्ये सातत्याने होत असलेली प्रचंड वाढ, सदनिकांच्या किंमतीत मूळ किंमतीपेक्षा कितीतरी अधिक पटीने होत असलेल्या वाढीमुळे शहरात सदनिका विकत घेण्याच्या राज्यातील सर्वसामान्य जनतेच्या स्वप्नपूर्तीत निर्माण होत असलेला अडसर, त्यामुळे राज्यातील शहरात सदनिकांचे वाढते दर नियंत्रित करून स्थिर ठेवण्याबाबत सर्वसामान्य जनतेकडून होत असलेली आग्रही मागणी, तदनुषंगाने सदनिकांचे वाढते दर नियंत्रित ठेवण्याकरिता राज्य शासनाने तातडीने आवश्यक ती उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.”

(७) “राज्यातील विशेषतः मुंबई, पुणे, ठाणे, नवी मुंबई व इतर प्रमुख शहरांचे झपाट्याने होत असलेले नागरीकरण यामुळे वाहनांच्या संख्येत दिवसेंदिवस होत असलेली लक्षणीय वाढ, शहरात असलेले अरुंद रस्ते, त्यामुळे ठिकठिकाणी वाहतुकीची कोंडी होऊन नागरिकांना सोसावा लागणारा त्रास, परिणामी वाहतूकीची समस्या दूर करण्याच्या दृष्टीने शासनाने ठोस उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.”

(८) “राज्यात रस्ते अपघातात दरवर्षी हजारो निष्पाप नागरिकांना प्राण गमवावे लागतात, विशेषतः राज्यातील राष्ट्रीय व राज्य महामार्गावर होत असलेल्या अपघातांचे आणि त्यातील मृत्युमुखी पडणाऱ्या नागरिकांचे प्रमाण लक्षणीय असते, सदरहू अपघात रोखण्यासाठी तातडीने प्रभावी उपाययोजना करण्याची असलेली नितांत आवश्यकता, राष्ट्रीय व राज्य महामार्गावर होत असलेल्या अपघातातील जखमींवर ‘गोल्डन अवर’ मध्ये वैद्यकीय उपचार उपलब्ध करून देण्यासाठी शासकीय आरोग्य व्यवस्थेची असलेली दुरवस्था, त्यामुळे राज्यातील राष्ट्रीय व राज्य महामार्गावर

अपघातग्रस्तांना 'गोल्डन अवर' मध्ये वैद्यकीय उपचार उपलब्ध करून देण्यासाठी सार्वजनिक आरोग्य विभागाच्या माध्यमातून ठराविक अंतरावर 'ट्रामा केअर सेंटर' उभारण्याबाबत शासनाने तातडीने कार्यवाही करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद करीत आहे."

(९) "केंद्र शासनाच्या अखत्यारीतील दादर येथील इंदू मिल्सच्या जागेवर महामानव परमपूज्य डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे भव्यदिव्य स्मारक उभारण्याचे काम राज्य शासनाने हाती घेतले आहे, सदरहू निर्णयामुळे महाराष्ट्र शासनाची कीर्ती देशभरातच नव्हे तर पूर्ण जगभरात पसरलेली आहे, कोल्हापूर जिल्ह्यातील छत्रपती श्री शाहू महाराज यांचे इतिहासातील योगदान अमुल्य आहे, कोल्हापूर जिल्ह्यातील कागल येथे जन्मलेल्या छत्रपती शाहू महाराज यांनी शैक्षणिक आणि सामाजिक क्षेत्रात केलेले काम अभूतपूर्व आहे, त्यांच्या या कामाची महती भावी पिढीस होणे गरजेचे आहे, यास्तव राज्य शासनाने केंद्र शासनाच्या अखत्यारीतील इंदू मिल्सच्या जागेवर उभारण्यात येत असलेल्या महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या भव्यदिव्य स्मारकाच्या धर्तीवर मुंबईतील ना. म. जोशी मार्ग व वरळी येथील सीताराम, पोद्दार व अपोलो मिल्स या केंद्र शासनाच्या अखत्यारीतील बंद गिरण्यांपैकी एका गिरणीच्या जागेवर छत्रपती शाहू महाराजांचे भव्यदिव्य स्मारक उभारण्याबाबत राज्य शासनाने केंद्र शासनाकडे पाठपुरावा करावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(१०) "राज्यातील पोलिसांना सतत २४ तास काम करावे लागत असल्यामुळे त्यांच्यावर दिवसेंदिवस कामाचा ताण वाढत आहे, तसेच पुरेशी शासकीय निवासस्थाने उपलब्ध नसल्यामुळे अनेक पोलिसांना भाड्याच्या घरात राहावे लागत आहे, शासनाकडून देण्यात येत असलेल्या शासकीय निवासस्थानांची अत्यंत दुरवस्था झाली आहे, कामाचा ताण, गृहनिर्माणाचा प्रश्न यांमुळे पोलीस बांधवांत निर्माण होत असलेले तणावाचे व नैराश्याचे वातावरण, परिणामी त्यांच्यावरील मानसिक ताण वाढत असून आत्महत्येचे प्रमाण वाढत आहे, पोलिसांच्या कार्यक्षमतेचा सर्वंकष विचार होवून त्यांच्या कामाचे तास, एक साप्ताहिक सुट्टी, निवासस्थाने इत्यादी मुलभूत समस्यांबाबत कायमस्वरूपी तोडगा काढण्याच्या दृष्टीने शासनाने ठोस उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."



**श्री. रामदास आंबटकर, वि.प.स. यांचे ठराव क्रमांक ११, १२, १३ व १४**

(११) "राज्यात विशेषतः विदर्भातील जिल्हा व ग्रामीण रुग्णालयांची स्थिती दयनीय आहे, रुग्णालयांतील सोयीसुविधा योग्य नसल्यामुळे दुर्बल घटकातील रुग्णांना योग्य उपचार मिळत नाहीत, त्यातच तज्ज्ञ डॉक्टरांची मोठ्या प्रमाणात पदे रिक्त आहेत, रुग्णालयातील देखभाल योग्यरित्या होत नसल्याने रुग्णालयांना आग लागण्याचे प्रकार मागील काही वर्षांत भंडारा, नागपूर, मुंबई व इतरही ठिकाणी घडले आहेत, यामुळे कित्येकांचे मृत्यू झाले आहेत, त्यामुळे रुग्णालयांचे संरचनात्मक लेखापरिक्षण (स्ट्रक्चरल ऑडिट) करून रुग्णांना योग्य सोय व उपचार होण्याच्या दृष्टीकोनातून शासनाने योग्य पाऊल उचलावे व रुग्णालयाची स्थिती सुधारण्याकरिता भरीव निधी उपलब्ध व्हावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करित आहे."

(१२) "राज्यात विशेषतः विदर्भात आदिवासी, दुर्गम व ग्रामीण भाग असून सदरहू परिसरात मोठ्या प्रमाणात शेतकरी वर्ग आहे, परंतु शेतकऱ्यांना आपल्या शेतात ये-जा करण्यास शेतरस्ते उपलब्ध नसल्याने शेतकऱ्यांना हंगामाच्या वेळी कृषी अवजारे, बैल-बंडी, ट्रॅक्टर यासारखी अवजारे ने-आण करण्यास मोठी अडचण निर्माण होते. त्यातच काही परिसरात रस्त्याचे मातीकाम झाले आहे. त्यावर मजबुतीकरण झाले नसल्याने शेतकऱ्यांना जाणे-येणे जिकरीचे झाले आहे. याकरिता महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेचे अभिसरण करून मातोश्री पांदण रस्ते योजना २०२१ मध्ये राबविण्याचा निर्णय घेतला असून सदर योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना रस्ते उपलब्ध होण्याच्या दृष्टीकोनातून मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून देण्याची आवश्यकता आहे. "शेत तेथे रस्ता" या संकल्पनेतून सर्व शेतात जाण्या-येण्याकरिता जिल्हा व तालुक्यातील रस्ते तसेच गावाच्या शिव धुऱ्यांवर शेतकऱ्यांना जाण्या-येण्याकरिता पांदण रस्ते मोठ्या प्रमाणात हाती घेऊन कामे तातडीने सुरू करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(१३) "राज्यात विशेषतः आदिवासी दुर्गम भागातील शेतकरी गेल्या ७०-८० वर्षांपासून वन जमिनींवर अतिक्रमण करून आपल्या कुटुंबांचा उदर निर्वाह करीत आहेत, परंतू अद्याप अतिक्रमण धारक शेतकऱ्यांना पट्टे मिळाले नाहीत, सदर शेतकरी तीन पिढ्यांपासून असणाऱ्या वन विभागाच्या

जाचक अटींमुळे विशेषतः विदर्भातील वन परिसरातील आदिवासी भागातील अतिक्रमण पट्टे धारकता मिळण्यापासून वंचित आहेत, त्यामूळे वन विभागाने जाचक अटी रद्द करून अतिक्रमण धारक शेतकऱ्यांना त्वरीत शेतजमिनीचे वन पट्टे द्यावेत, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(१४) "राज्यात विशेषतः विदर्भातील अपूर्ण प्रकल्पांची स्थिती, विदर्भात प्रामुख्याने छोटे-मोठे प्रकल्प गेल्या २० वर्षापासून मंजूर असूनही अद्याप बऱ्याच प्रकल्पांची कामे पूर्ण झालेली नाहीत, अपुऱ्या अनुशेषा अभावी भुसंपादन व पर्यावरण विषयक बाबींमध्ये निर्माण होणाऱ्या समस्या, अनेक सिंचन प्रकल्प प्रलंबित आहेत, विदर्भातप्रकल्पांची प्रलंबित कामे पूर्ण होण्याच्या दृष्टीने शासनाने तातडीने कार्यवाही करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

**श्री. अशोक** ऊर्फ **भाई जगताप, वि.प.स. यांचे ठराव क्रमांक १५, १६, १७, १८ व १९**

(१५) "केंद्र शासनाने राज्यात मुख्य रस्त्यापासून खेडे गावांना जोडण्याकरिता पंतप्रधान ग्रामसडक योजना अंमलात आणलेली आहे. त्याच धर्तीवर राज्यात पांदण रस्ता दुरुस्ती व मुख्यमंत्री सडक योजना राज्य शासनाने सुरू कराव्यात, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(१६) "भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३७१ अन्वये राज्यातील मराठवाडा, विदर्भ व उर्वरित महाराष्ट्रासाठी यापूर्वी स्थापन करण्यात आलेल्या वैधानिक विकास मंडळाच्या धर्तीवर कोकण प्रदेशासाठी स्वतंत्र वैधानिक विकास मंडळाची स्थापना करण्याबाबत राज्य शासनाने कार्यवाही करून त्याबाबत केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घ्यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(१७) "मुंबई व उपनगरातील खाजगी विकासकांनी बांधलेल्या सदनिकांच्या किंमती सर्वसामान्याच्या आवाक्याबाहेर असल्याने म्हाडाने मुंबई व उपनगरातील नागरिकांसाठी मोठ्या प्रमाणावर सर्वसामान्य ग्राहकांना परवडतील अशा सदनिका बांधण्याचा कालबद्ध कार्यक्रम शासनाने तातडीने हाती घ्यावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."



(१८) "मुंबई शहरामध्ये अत्यंत मोक्याच्या जागेवर असलेल्या अनेक खाजगी मिल मालकांच्या तसेच राष्ट्रीयीकृत कापड गिरण्या बंद पडल्यानंतर गिरण्या ज्याठिकाणी होत्या, त्याठिकाणी गगनचुंबी इमारती, मॉल, खाजगी कंपन्यांच्या इमारती बांधकामास सुरूवात झाली, परंतु सदर जुन्या गिरण्यांमध्ये काम करणाऱ्या कामगार व त्यांच्या कुटुंबियांना मात्र गिरण्यांच्या जागी उभ्या राहणाऱ्या इमारतींमध्ये राहण्याच्या जागा दिल्या नाहीत. तसेच मॉल, कार्यालय यामध्ये नोकऱ्यासुद्धा दिलेल्या नाहीत, गिरणीच्या जमिनीपैंकी विहित हिस्सा महापालिका, म्हाडा यांना द्यावयाचा आहे. परंतु अनेक मालकांनी जमिनी म्हाडा व महापालिकेस दिलेल्या नाहीत. ६७,००० घरे गिरणी कामगारांकरिता बांधणार असे आश्वासन शासनाकडून देण्यात आलेले आहे. तथापि, बांधलेली ६,९०० घरे गिरणी कामगारांना केव्हा वितरीत करण्यात येणार आणि राहिलेली ६०,००० घरे केव्हा बांधणार याबद्दल शासनाकडून कोणताही खुलासा नाही. तसेच गिरण्यांच्या चाळीत राहणाऱ्या कामगारांना ३०० चौ.फूटाच्या खोल्या देखील मिळाल्या नाहीत. गेल्या १० वर्षात अनेक कामगार मृत झाले. वर्षानुवर्षे गिरण्यांमध्ये काम केलेल्या कामगारांना गिरण्यांच्या जागेवर घरे देणे याची मागणी शासनाकडे तसेच म्हाडाकडे अनेक वर्षापासून केली जात आहे. म्हणून मुंबईतील गिरणी कामगारांना घरे देण्याच्या दृष्टीने शासनाने विहित मर्यादेचा (टाईम बाऊंड) कार्यक्रम आखून त्यांची ठोस अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(१९) "राज्यात प्रत्येक जिल्ह्यात शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय सुरू करण्याची गरज लक्षात घेता, ज्या विभागामध्ये खाजगी अभियांत्रिकी महाविद्यालये बंद पडण्याच्या अवस्थेत आहेत, तेथे ती ताब्यात घेऊन पायाभूत सुविधांचा वापर करून शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालये सुरू करावीत, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

**श्री. अभिजित वंजारी, वि.प.स. यांचे ठराव क्रमांक २०, २१, २२ व २३**

(२०) "विदर्भात वीज निर्मितीचे अनेक प्रकल्प आहेत, राज्यातील वीज निर्मितीपैकी निम्मा वीज निर्मितीचा वाटा विदर्भाचाच असून त्याठिकाणी मोठ्या प्रमाणावर भारनियमन होते, भारनियमनामुळे विद्यार्थ्यांचे होणारे शैक्षणिक नुकसान, व्यापारी जगात होणारे आर्थिक नुकसान, विदर्भातील

वीज इतरत्र जात असतानासुद्धा विदर्भातील वीज ग्राहकांकडून वीज हानीच्या नावाने पैसा वसूल करण्यात येतो, वीजेअभावी शेती सिंचनापासून वंचित राहणे यामुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे होणारे प्रचंड नुकसान, विजेअभावी विदर्भात उद्योग न येणे, परिणामी बेरोजगारांची संख्या प्रचंड प्रमाणात वाढत आहे, विदर्भामध्ये मोठ्या प्रमाणात प्रदूषण होऊन देखील तेथील विकास होत नाही, विदर्भात उत्पादीत उद्योगांना सवलतीच्या दरात वीज पुरवठा करण्याची नितांत गरज लक्षात घेता विदर्भातील भारनियमन रद्द करण्याच्या दृष्टीने शासनाने तातडीने उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(२१) "राज्यात देशी खेळांऐवजी इतर खेळांमध्ये लक्षणीय वाढ होऊन खेळांडूचे देशी खेळांकडे होत असलेले दुर्लक्ष, त्यामुळे राज्यात देशी खेळ टिकून राहण्यासाठी विशेषतः ग्रामीण भागातील होतकरू व तरुण खेळाडू, देशी खेळांमध्ये मोठ्या प्रमाणात आकर्षित होऊन त्यांच्यामध्ये असलेल्या क्रीडा नैपुण्याला वाव मिळण्यासाठी विशिष्ट प्रोत्साहनपर योजना राबविण्याकरिता शासनाच्या क्रीडा धोरणामध्ये आवश्यक ते बदल करण्यासाठी धोरणात्मक निर्णय घेण्यात यावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(२२) "राज्यातील वेगवेगळ्या प्रकल्पांमुळे विस्थापित झालेल्या प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनांचे काम अद्यापही पूर्ण झालेले नसल्यामुळे विस्थापितांचे होत असलेले हाल, त्यामुळे शासनाच्या विचाराधीन प्रकल्पांसाठी जमिनी देण्याच्या कामाला शेतकऱ्यांचा होत असलेला विरोध, त्याबाबत निर्माण केल्या जाणाऱ्या कायदेशीर अडचणी इत्यादी बाबी विचारात घेता प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचे प्रलंबित काम तात्काळ पूर्ण करण्यासाठी कालबद्ध धडक कार्यक्रम राबविण्यात यावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(२३) "राज्यात ज्येष्ठ नागरिकांच्या हितासाठी विविध निर्णय व धोरण ठरविलेले असताना त्याबाबतचे लाभ ज्येष्ठ नागरीकांना मिळत नसल्याचे निदर्शनास आले आहे, ज्येष्ठ नागरिकांच्या आरोग्याच्या समस्या, सुरक्षितता यासाठी ज्येष्ठ नागरिकांच्या हितासंबंधी धोरण ठरवून जनजागृती होण्याच्या दृष्टीने ज्येष्ठ नागरीकांसाठी स्वतंत्र हेल्पलाईन (मदतकेंद्र) व संकेतस्थळ सुरू करावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."



**श्री. राजेश राठोड वि.प.स. यांचे ठराव क्रमांक २४, २५, २६ व २७**

(२४) "विदर्भात नापिकी, अतिवृष्टी, जलप्रकोप, दुबार पेरणी, तिबार पेरणी, ओला व कोरडा दुष्काळ असूनही पीक विमा नुकसान भरपाईपासून आणेवारी व उंबरठा उत्पन्नाच्या जाचक निकषामुळे शेतकरी वंचित राहत आहेत, याला शंभर वर्ष जुनी ब्रिटिशकालीन आणेवारी व उंबरठा काढण्याचे निकष कारणीभूत असल्याने त्यात बदल करून सुधारित आणेवारी व उंबरठा काढण्याचे निकष तयार करण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घ्यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(२५) "शेतकऱ्यांना शेती व्यवसायासाठी लागणारी रासायनिक खते, अवजारे, किटकनाशक यांच्या किंमतीमध्ये सतत होणारी वाढ, तसेच शेतकऱ्यांना शेतमालाचे न परवडणारे भाव विचारात घेता, उत्पादन खर्चावर आधारित असे शेतमालाचे भाव शेतकऱ्यांना मिळण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घ्यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(२६) "राज्यातील अत्यल्प व अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या शेतातील विहिरी व विद्युतपंपाचा मोठ्या प्रमाणात राहिलेला अनुशेष, विद्युत जोडणी मिळण्याकरिता होणारा विलंब त्यामुळे विद्युतपंपावर घेतलेल्या कर्जाचा वाढत असलेला आर्थिक बोजा, शेतात राबविल्या जाणाऱ्या ऊस पिकांचे पाण्याअभावी होणारे नुकसान टाळण्याच्या दृष्टीने व उक्त योजनेची अंमलबजावणी परिणामकारकरित्या करण्यासाठी शासनाने धोरणात्मक कार्यक्रम राबवावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(२७) "हिंदवी स्वराज्याचे संस्थापक "छत्रपती शिवाजी महाराज" सर्वत्र वंदनीय आहेत. कोल्हापूर विद्यापीठाचे शिवाजी विद्यापीठ असे नामकरण करण्यात आल्यामुळे महाराजांच्या नावाचा एकेरी उल्लेख होत आहे. हा प्रकार महाराष्ट्राच्या अस्मितेच्या दृष्टीने अयोग्य असल्याने शिवाजी विद्यापीठाचे नाव बदलून "छत्रपती शिवाजी महाराज विद्यापीठ, कोल्हापूर" असे करण्यात यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(शा.म.मु.) एचबी २६४९—२ (३००-२-२०२३)

**श्री. जयंत आसगावकर वि.प.स. यांचे ठराव क्रमांक २८, २९, ३० व ३१**

(२८) "राज्यातील विनाअनुदान तत्वावरील माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांना अनुदानाअभावी प्रयोगशाळा, ग्रंथालये व इतर शैक्षणिक सोई सुविधा उपलब्ध होऊ शकत नाही, त्यामुळे विद्यार्थ्यांच्या प्रगतीवर होणारा विपरित परिणाम विचारात घेता विनाअनुदान तत्वावरील राज्यातील सर्व माध्यमिक शाळांमध्ये विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये यासाठी शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या भरती तसेच विविध आवश्यक सोईसुविधा उपलब्ध होण्यासाठी सर्व माध्यमिक शाळांना चालू शैक्षणिक वर्षापासून १०० टक्के अनुदान देण्यात यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(२९) "राज्यात अनेक ठिकाणी रस्ते अपघात होऊन दरवर्षी हजारो नागरिकांचे प्राण या अपघातात गेलेले आहेत. राज्याचे राष्ट्रीय महामार्ग व राज्य महामार्गावर मोठ्या प्रमाणामध्ये अशा प्रकारचे अपघात होत आहेत. हे अपघात रोखण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना करण्याची नितांत गरज आहे. अपघातस्थळी अपघातग्रस्तांवर उपचार करण्यासाठी शासकीय रुग्णालयेही आसपास नाहीत. या अपघातग्रस्तांना उपचार करण्यासाठी राष्ट्रीय महामार्ग येथे आरोग्य विभागाच्या माध्यमातून लहान उपचार केंद्र सुरू करणे आवश्यक आहे. तसेच या उपचार केंद्रांमध्ये वैद्यकीय अधिकारी, स्टाफ नर्सेस व इतर कर्मचाऱ्यांची नेमणूक देखील करण्याची आवश्यकता आहे. राज्य महामार्ग व राष्ट्रीय महामार्गावर पन्नास किलोमीटर अंतरावर प्रत्येक ठिकाणी एक-एक उपचार केंद्र ट्रॉमा सेंटर (Trauma Care Center) उघडल्यास अपघातग्रस्तांचे प्राण वाचवणे सोपे होऊन जाईल व यामधून दरवर्षी वाढत आलेली अपघातातील मृतांची संख्या आटोक्यात आणण्यात निश्चितच उपयोगी ठरेल. तरी शासनाने राष्ट्रीय महामार्ग व राज्य महामार्गावरील अपघातग्रस्तांच्या बचावासाठी ट्रॉमा सेंटर (Trauma Care Center) उभारण्याबाबत तातडीने उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(३०) "केंद्र शासनाने राज्यात मुख्य रस्त्यापासून खेडे गावांना जोडण्याकरिता पंतप्रधान ग्रामसडक योजना अंमलात आणलेली आहे. त्याच धर्तीवर राज्यात पांदण रस्ता दुरुस्ती व मुख्यमंत्री सडक योजना राज्य शासनाने सुरू कराव्यात, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."



(३१) "राज्यात प्रत्येक जिल्ह्यात शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय सुरू करण्याची गरज लक्षात घेता, ज्या विभागामध्ये खाजगी अभियांत्रिकी महाविद्यालये बंद पडण्याच्या अवस्थेत आहेत, तेथे ती ताब्यात घेऊन पायाभूत सुविधांचा वापर करून शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालये सुरू करावीत, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

**डॉ. प्रज्ञा सातव वि.प.स. यांचे ठराव क्रमांक ३२, ३३, ३४, ३५ व ३६**

(३२) "राज्यात विशेषतः मराठवाड्यात सतत निर्माण होणारा भीषण दुष्काळ आणि तीव्र पाणी टंचाईची परिस्थिती लक्षात घेता दुष्काळ निवारणार्थ करावयाच्या कायमस्वरूपी उपाययोजना, मराठवाड्यात शेतीसाठी शाश्वत सिंचन अभियान सुरू करून मराठवाड्यातील सिंचनाचा जलआराखडा तयार करून त्याची अंमलबजावणी करण्यासाठी मराठवाड्यासाठी सक्षम जल आयुक्तालय सुरू करावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(३३) "राज्यात देशी खेळांऐवजी इतर खेळांमध्ये लक्षणीय वाढ होऊन खेळांडूचे देशी खेळांकडे होत असलेले दुर्लक्ष, त्यामुळे राज्यात देशी खेळ टिकून राहण्यासाठी विशेषतः ग्रामीण भागातील होतकरू व तरुण खेळाडू, देशी खेळांमध्ये मोठ्या प्रमाणात आकर्षित होऊन त्यांच्यामध्ये असलेल्या क्रीडा नैपुण्याला वाव मिळण्यासाठी विशिष्ट प्रोत्साहनपर योजना राबविण्याकरिता शासनाच्या क्रीडा धोरणामध्ये आवश्यक ते बदल करण्यासाठी धोरणात्मक निर्णय घेण्यात यावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(३४) "राज्यात अनाथ, निराधार, परितक्त्या, घटस्फोटित, विधवा, अनैच्छिक मातृत्व लाभलेल्या अपादग्रस्त व शिक्षणाचा अभाव असणाऱ्या महिलांचा यात होणारा शारीरिक, मानसिक व सामाजिक छळ थांबवून त्यांची शैक्षणिक, आर्थिक व सामाजिक उन्नती होण्याच्या दृष्टीने महिलांना आत्मनिर्भर करण्यासाठी शासनाने कालबद्ध कार्यक्रम आखून त्याची त्वरित अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(३५) "राज्यात किल्ल्यांचे ऐतिहासिक महत्त्व लक्षात घेता किल्ल्यांचे परिसर पर्यटन केंद्र म्हणून विकसित करण्यासाठी तसेच त्या ठिकाणी मार्गदर्शक नेमण्याबाबत व पर्यटकांसाठी अन्य आवश्यक त्या सोईसुविधा उपलब्ध

करून देऊन या सर्व पुरातन किल्ल्यांचे ऐतिहासिक महत्त्व कायम राखण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(३६) "दारिद्र्य रेषेखालील कुटुंबाची यादी तयार करताना राज्यात अनेक कुटुंबाचे सर्वेक्षण न होणे, त्यामुळे खरोखरच दारिद्र्य रेषेखाली असणाऱ्या कुटुंबांना पिवळ्या रंगाच्या शिधापत्रिकांपासून वंचित रहावे लागणे, शासनाच्या वतीने रुपये १५,०००/- उत्पन्न मर्यादा ठरविणे, मात्र वाढती महागाई आणि रुपयाचे झालेले अवमूल्यान यामुळे रुपये ५०,०००/- वार्षिक उत्पन्न मर्यादा पात्र धरण्याची गरज निर्माण होणे, यामुळे राज्यातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल जनतेला दारिद्र्य रेषेखालील योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे इष्टांक वाढवून घेण्याची मागणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

**डॉ. वजाहत मिर्झा वि.प.स. यांचे ठराव क्रमांक ३७, ३८, ३९, ४० व ४२**

(३७) "राज्यातील अल्पसंख्याक समाजातील नागरिकांना शिक्षण व रोजगाराच्या संधी कमी प्रमाणात उपलब्ध होत असल्याने हा समाज विकासापासून वंचित आहे, राज्य शासनाच्या अनेक योजना या समाजापर्यंत पोहोचत नसल्याने या समाजाला अनेक लाभ मिळत नाहीत, मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळ हे फक्त नावापुरते उरलेले आहे, या महामंडळाद्वारे एकाही ठिकाणी एकही व्यवसायिक व थेट कर्ज पूर्ण करण्यात आले नाही, मागील तीन वर्षांपासून या महामंडळाची कार्यकारणी सुद्धा घोषित केली नसून शासनाकडून या महामंडळास निधीही उपलब्ध करून दिला जात नाही, तसेच या समाजातील हजारो विद्यार्थ्यांना अनेक वर्षांपासून शिष्यवृत्ती देखील मिळत नाही, शाळांना योग्य अनुदान देखील मिळत नसल्यामुळे शैक्षणिक क्षेत्रात देखील अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थी मागास राहत आहेत, यामुळे या समाजातील नागरिकांच्या आर्थिक व शैक्षणिक मागासलेपणामध्ये वाढ होऊन हा समाज विकासापासून दूरच राहिला आहे, या समाजाच्या आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक उत्कर्षासाठी शासनाने अधिकाधिक प्रभावी उपाययोजना आखाव्यात, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(३८) "विदर्भात वीज निर्मितीचे अनेक प्रकल्प आहेत, राज्यातील वीज निर्मितीपैकी निम्मा वीज निर्मितीचा वाटा विदर्भाचाच असून त्याठिकाणी



मोठ्या प्रमाणावर भारनियमन होते, भारनियमनामुळे विद्यार्थ्यांचे होणारे शैक्षणिक नुकसान, व्यापारी जगात होणारे आर्थिक नुकसान, विदर्भातील वीज इतरत्र जात असतानासुध्दा विदर्भातील वीज ग्राहकांकडून वीज हानीच्या नावाने पैसा वसूल करण्यात येतो, वीजेअभावी शेती सिंचनापासून वंचित राहणे यामुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे होणारे प्रचंड नुकसान, विजेअभावी विदर्भात उद्योग न येणे, परिणामी बेरोजगारांची संख्या प्रचंड प्रमाणात वाढत आहे, विदर्भामध्ये मोठ्या प्रमाणात प्रदूषण होऊन देखील तेथील विकास होत नाही, विदर्भात उत्पादित उद्योगांना सवलतीच्या दरात वीज पुरवठा करण्याची नितांत गरज लक्षात घेता विदर्भातील भारनियमन रद्द करण्याच्या दृष्टीने शासनाने तातडीने उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(३९) "राज्यात अनेक ठिकाणी पाणी टंचाईची स्थिती निर्माण झाली असून, ग्रामीण भागातील नागरिकांना चार-पाच मैल दूरवरून पाणी आणण्याची परिस्थिती निर्माण झालेली आहे. पावसाळ्यातील पाण्याची अनियमितता, निसर्गाचा लहरीपणा, त्यामुळे निर्माण होणारी भीषण पाणी टंचाई, परिणामी पिण्याच्या पाण्यासाठी होणारी भटकंती ही अतिशय गंभीर बाब झालेली आहे, त्यावर जलतज्ज्ञांच्या मार्गदर्शनातून वेगवेगळी उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे, (उदा. रेन वॉटर हार्वेस्टींग) परंतु याबद्दलची अंमलबजावणी होताना दिसत नाही, महाराष्ट्रातील सर्व शासकीय तसेच खाजगी इमारतींच्या छतावर पडणाऱ्या पावसाच्या पाण्याचे एकत्रीकरण (रेन वॉटर हार्वेस्टींग) करून त्याचे इमारतीच्या आवारातील जमिनीत पाण्याच्या स्त्रोताजवळ पुनर्भरण करण्याची आवश्यकता आहे, शहरी भागांमध्ये हॉटेल्स, रेस्टॉरेंट व इतर ठिकाणी मोठ्या प्रमाणामध्ये पाण्याचा अपव्यय होताना दिसतो, तो देखील टाळण्याची आवश्यकता आहे, अशा अनेक उपाययोजना केल्यास राज्यात पिण्यासाठी, शेतीसाठी, औद्योगिक कामांसाठी व इतर वापरासाठीच्या पाण्याचा प्रश्न नक्कीच मार्गी लागेल. यासाठी शासनाकडून कठोर निर्देश देण्याची गरज आहे. तसेच राज्यात खाजगी नवीन इमारत बांधकाम करीत असताना बांधकाम परवाना देण्यासाठी जसे इतर बाबी तपासण्यात येतात, तसेच राज्यातील ग्रामपंचायत ते महानगरपालिका अंतर्गत येणाऱ्या इमारतींवरील छताचे पाणी त्या आवारातील जलस्त्रोतात सोडण्याचे नियोजन आहे किंवा कसे हे

तपासूनच बांधकाम परवानग्या द्याव्यात व अशाप्रकारे विविध उपाययोजना करून पावसाचे पाणी व वैयक्तिक वापरासाठी असलेले पाणी यांचे योग्य नियोजन करण्यासाठी शासनाने अधिकाधिक उपाययोजना कराव्यात, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(४०) "राज्यातील विनाअनुदान तत्वावरील माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांना अनुदानाअभावी प्रयोगशाळा, ग्रंथालये व इतर शैक्षणिक सोयी सुविधा उपलब्ध होऊ शकत नाही, त्यामुळे विद्यार्थ्यांच्या प्रगतीवर होणारा विपरित परिणाम विचारात घेता विनाअनुदान तत्वावरील राज्यातील सर्व माध्यमिक शाळांमध्ये विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये यासाठी शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या भरती तसेच विविध आवश्यक सोयीसुविधा उपलब्ध होण्यासाठी सर्व माध्यमिक शाळांना चालू शैक्षणिक वर्षापासून १०० टक्के अनुदान देण्यात यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(४२) "राज्यात अनेक ठिकाणी रस्ते अपघात होऊन दरवर्षी हजारो नागरिकांचे प्राण या अपघातात गेलेले आहेत. राज्याचे राष्ट्रीय महामार्ग व राज्य महामार्गावर मोठ्या प्रमाणामध्ये अशाप्रकारचे अपघात होत आहेत. हे अपघात रोखण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना करण्याची नितांत गरज आहे. अपघातस्थळी अपघातग्रस्तांवर उपचार करण्यासाठी शासकीय रुग्णालयेही आसपास नाहीत. या अपघातग्रस्तांना उपचार करण्यासाठी राष्ट्रीय महामार्ग येथे आरोग्य विभागाच्या माध्यमातून लहान उपचार केंद्र सुरू करणे आवश्यक आहे. तसेच या उपचार केंद्रांमध्ये वैद्यकीय अधिकारी, स्टाफ नर्सेस व इतर कर्मचाऱ्यांची नेमणूकदेखील करण्याची आवश्यकता आहे. राज्य महामार्ग व राष्ट्रीय महामार्गावर पन्नास किलोमीटर अंतरावर प्रत्येक ठिकाणी एक-एक उपचार केंद्र ट्रामा सेंटर (Trauma Care Center) उघडल्यास अपघातग्रस्तांचे प्राण वाचवणे सोपे होऊन जाईल व यामधून दरवर्षी वाढत आलेली अपघातातील मृतांची संख्या आटोक्यात आणण्यात निश्चितच उपयोगी ठरेल. तरी शासनाने राष्ट्रीय महामार्ग व राज्य महामार्गावरील अपघातग्रस्तांच्या बचावासाठी ट्रामा सेंटर (Trauma Care Center) उभारण्याबाबत तातडीने उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."



**डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, वि.प.स. यांचे ठराव क्रमांक ४३ व ४४**

(४३) "पुणे शहरातील विद्यापीठ अनुदान आयोगाचे (यूजीसी) प्रादेशिक कार्यालय बंद करून ते दिल्लीला नेण्याच्या निर्णयाला राज्यातील प्राध्यापक, प्राचार्य आणि विद्यार्थ्यांनी विरोध दर्शविला आहे. आयोगाने घेतलेल्या या निर्णयाचा पुनर्विचार व्हावा अशी मागणी राज्यभरातील प्राध्यापक, प्राचार्य यांच्याकडून करण्यात येत आहे. पुण्यासह देशभरातील सात ठिकाणची प्रादेशिक कार्यालये बंद करण्याचा निर्णय विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) घेतला आहे. पुण्यातील प्रादेशिक कार्यालयांतर्गत महाराष्ट्र, गुजरात आणि गोवा ही राज्ये येतात. या कार्यालयांमार्फत आयोगाच्या विविध योजना प्राध्यापक व प्राचार्यांसाठी तसेच विद्यापीठे आणि महाविद्यालयांना विकासासाठी अनुदान देण्याच्या योजना राबविण्यात येतात. संशोधन प्रकल्पासाठी देखील अनुदान देण्यात येते. महाविद्यालयांमध्ये परिषदा घेण्यासाठी मदत करण्यात येते. या योजनांचा लाभ घेण्यासाठीची प्रक्रिया प्रादेशिक कार्यालयांमार्फत होते. त्यामुळे पुण्यातील पश्चिम प्रादेशिक कार्यालय बंद झाल्यानंतर, प्राध्यापक, प्राचार्य, महाविद्यालये आणि विद्यापीठांना यापुढे विविध योजनांसाठी दिल्लीला जावे लागणार आहे. आयोगाच्या दिल्ली येथील कार्यालयातून दूरध्वनी किंवा ईमेलद्वारे समाधानकारक उत्तरे मिळत नाहीत. अशावेळी प्रादेशिक कार्यालय न्याय देण्याचे काम करत होते. हे कार्यालय बंद करण्याच्या धोरणामुळे शैक्षणिक प्रश्न अधिक गुतांगुतीचे होतील. मानसिक आणि आर्थिक त्रासामुळे आयोगाच्या मुख्यालयात कोणी जाणार नाही. आयोगाचे प्रादेशिक कार्यालय बंद केल्याने अनुदान मिळविण्यासाठी विद्यापीठ, महाविद्यालयांना पाठपुरावा करणे अवघड जाणार आहे. त्याचबरोबर भविष्यात शैक्षणिक दर्जा देखील खालावण्याची शक्यता आहे. या सर्व बाबी लक्षात घेऊन पुण्याचे प्रादेशिक कार्यालय बंद करण्याचा घेतलेला निर्णय यूजीसीने तत्काळ रद्द करण्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाकडे (यूजीसी) राज्य शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाने पाठपुरावा करावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(४४) "राज्यातील शहरी लोकसंख्या दिवसेंदिवस वाढतच असून त्याचा ताण स्थानिक स्वराज्य संस्थांवर येत असतो. लोकसंख्येच्या दैनंदिन गरजा

भागवण्यासाठी उपलब्ध असलेल्या स्रोतांना नेहमीच मर्यादा येत असतात. त्यामुळेच विविध शहरातील नागरी वसाहतींमध्ये नैसर्गिक संसाधनांचा योग्य वापर करण्याची नितांत आवश्यकता आहे. यामध्ये घनकचरा व्यवस्थापन, सौर ऊर्जेचा जास्तीत-जास्त वापर, रेन वॉटर हार्वेस्टिंग यांसारखे प्रकल्प रहिवासी वसाहतींमध्ये उभारल्यास त्याचा फायदा स्थानिक स्वराज्य संस्थांना व पर्यावरणास होतो. म्हणून अशा पर्यावरण संवेदनशील गृहनिर्माण सहकारी संस्थांमध्ये रेनवॉटर हार्वेस्टिंग, जैविक खत निर्मिती, सौर ऊर्जा निर्मिती आणि सांडपाण्यावरील पुनर्प्रक्रिया प्रकल्प उभारणाऱ्या संस्थांना मालमत्ता करांमध्ये सवलत देण्यासाठी योग्य ते धोरण ठरविण्यात यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

**श्री. सुरेश धस, वि.प.स. यांचे ठराव क्रमांक ४५, ४६ व ४७**

(४५) "विश्ववंदनीय "छत्रपती शिवाजी महाराजांचा" व स्वराज्य रक्षक "छत्रपती संभाजी महाराजांच्या" गौरवपूर्ण, वैभवशाली, आदर्शवादी, स्वातंत्र्याचं प्रतिक असलेला, महाराष्ट्राची मान जगात स्वाभिमानानं उंचवणारा दृष्टीमान इतिहास हा शालेय शिक्षणात अत्यंत संक्षिप्त स्वरुपात आहे. हा संपूर्ण इतिहास राज्यात इयत्ता १ ली ते १० वी पर्यंतच्या अभ्यासक्रमात टप्प्याटप्प्याने समाविष्ट करावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करित आहे."

(४६) "राज्यातील अनुसूचित जमातीच्या जात पडताळणी समित्यांनी दिलेल्या निर्णयाला फक्त उच्च न्यायालयातच अपिल करता येत असल्याने अनेक प्रकरणे निर्णय देताना हेतुपुरस्पर, पूर्वग्रहदूषितपणे जाणीवपूर्वक विरोधात दिले गेल्याचे मा.उच्च न्यायालयात व मा.सर्वोच्च न्यायालयात वारंवार सिद्ध होत असून अनेक प्रकरणी जात पडताळणी समित्यांना लाखांवर दंड, समज व निर्णय समितीच बरखास्त केल्याचे मा. उच्च न्यायालयाने/ मा.सर्वोच्च न्यायालयाचे शास्ती म्हणून आहे. अर्थपूर्ण तडजोडीमुळे तसेच राजकीय दबावाखाली येवून येथील निर्णय मोठ्या प्रमाणात बदलत असल्याचे निदर्शनास येत असल्याने संपूर्ण आदिवासी समाजात जात पडताळणी समितीचे कामकाज पक्षपातीपणे होत असल्याचा जनक्षोभ मोठ्या प्रमाणावर निर्माण झालेला आहे. खरा लाभार्थी वैधता प्रमाणपत्रापासून वंचित राहू नये म्हणून राज्य शासनाने राज्यातील



अनुसूचित जमातीच्या जातपडताळणी समित्यांवर न्यायाधिशांची नेमणूक करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(४७) "राज्यात महिलांवरील अत्याचारात दिवसेंदिवस वाढ होत असल्याने समाजाच्या सर्वच स्तरातून महिलांसाठी कठोर कायदा करून त्यांना सुरक्षितता देण्यासाठी प्रचंड जनक्षोभ निर्माण झालेला आहे. महिलांच्या सुरक्षिततेसाठी प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी गुन्हा अन्वेषण विभागाच्या धर्तीवर तात्काळ एक महिला पोलीस स्टेशन स्थापन करून, तसेच याबाबत कठोर कायद्याची निर्मिती करण्यात यावी व त्याची अंमलबजावणी तात्काळ करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

**श्री. सचिन अहिर वि.प.स. यांचे ठराव क्रमांक ४८, ४९, ५०, ५१ व ५२**

(४८) "राज्यात विशेषतः विदर्भातील जिल्हा व ग्रामीण रुग्णालयांची स्थिती दयनीय आहे, रुग्णालयातील सोयीसुविधा योग्य नसल्यामुळे रुग्णांना योग्य उपचार मिळत नाहीत, त्यातच रुग्णालयातील देखभाल योग्यरित्या होत नसल्याने रुग्णालयाला आग लागण्याचे प्रकार नुकतेच मागील काही दिवसांत भंडारा, नागपूर, मुंबई व इतरही ठिकाणी घडले आहेत, यामुळे कित्येकांचे मृत्यू झाले आहेत, त्यामुळे रुग्णालयांचे संरचनात्मक लेखापरिक्षण (स्ट्रक्चरल ऑडिट) करून रुग्णांना योग्य सोयीसुविधा व उपचार होण्याच्या दृष्टीकोनातून शासनाने योग्य पाऊल उचलावे व रुग्णालयांची स्थिती सुधारण्याकरिता भरीव निधी उपलब्ध करून द्यावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करित आहे."

(४९) "विदर्भ, मराठवाडा, उर्वरित महाराष्ट्र, कोकण या भागांचा बहुतांश क्षेत्राचा अनुशेष अद्याप शिल्लक असल्यामुळे वैधानिक विकास मंडळांना तातडीने मुदतवाढ द्यावी, कोकणचा समावेश उर्वरित महाराष्ट्र वैधानिक विकास मंडळामध्ये असला तरी कोकणचा अनुशेष तातडीने भरून निघण्यासाठी कोकणासाठी स्वतंत्र वैधानिक विकास मंडळाची स्थापना करण्याचा निर्णय घेऊन आवश्यक प्रक्रिया पार पाडावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनाला करीत आहे."

(५०) "राज्यात विशेषतः विदर्भात आदिवासी, दुर्गम व ग्रामीण भाग असून सदरहू परिसरात मोठ्या प्रमाणात शेतकरी वर्ग आहे, परंतु शेतकऱ्यांना आपल्या शेतात ये-जा करण्यास शेतरस्ते उपलब्ध नसल्याने शेतकऱ्यांना हंगामाच्या वेळी कृषी अवजारे, बैल-बंडी, ट्रॅक्टर यासारखी अवजारे ने-आण

करण्यास मोठी अडचण निर्माण होते. त्यातच काही परिसरात रस्त्याचे मातीकाम झाले आहे. त्यावर मजबुतीकरण झाले नसल्याने शेतकऱ्यांचे जाणे-येणेजिकरीचे झाले आहे. याकरीता महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेचे अभिसरण करून मातोश्री पांदण रस्ते योजना सन २०२१ मध्ये राबविण्याचा निर्णय घेतला असून सदर योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना रस्ते उपलब्ध होण्याच्या दृष्टीकोनातून मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून देण्याची आवश्यकता आहे. "शेत तेथे रस्ता" या संकल्पनेतून सर्व शेतात जाण्या-येण्याकरीता जिल्हा व तालुक्यातील रस्ते तसेच गावाच्या शिव धुऱ्यांवर शेतकऱ्यांना जाण्या-येण्याकरीता पांदण रस्ते मोठ्या प्रमाणात हाती घेवून कामे तातडीने सुरू करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(५१) "राज्यातील खेळाडूंची राष्ट्रीय स्तरावर होत असलेली असमाधानकारक कामगिरी लक्षात घेता क्रीडा क्षेत्राचा सर्वांगीण विकास होण्याकरिता व दर्जेदार खेळाडू निर्माण करण्यासाठी तालुकास्तरावर क्रीडा प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्यात यावीत, त्यासाठी प्रशिक्षित मार्गदर्शक नेमण्यात यावेत, अशा केंद्रांना अद्ययावत साहित्य व आर्थिक सहाय्य देण्यात यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(५२) "राज्यातील विनाअनुदान तत्वावरील माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांना अनुदानाअभावी प्रयोगशाळा, ग्रंथालये व इतर शैक्षणिक सोयी सुविधा उपलब्ध होऊ शकत नाही, त्यामुळे विद्यार्थ्यांच्या प्रगतीवर होणारा विपरीत परिणाम विचारात घेता विनाअनुदान तत्वावरील राज्यातील सर्व माध्यमिक शाळांमध्ये विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये यासाठी शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या भरती तसेच विविध आवश्यक सोयीसुविधा उपलब्ध होण्यासाठी सर्व माध्यमिक शाळांना चालू शैक्षणिक वर्षापासून १०० टक्के अनुदान देण्यात यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

**श्री. अमोल मिटकरी वि.प.स. यांचे ठराव क्रमांक ५३, ५४, ५५ व ५६**

(५३) "राज्यातील किल्ले व दुर्ग यांचे ऐतिहासिक महत्त्व लक्षात घेता या किल्ले व दुर्गांचा परिसर पर्यटन केंद्र म्हणून विकसित करण्यासाठी तसेच त्या ठिकाणी मार्गदर्शक नेमण्याबाबत व पर्यटकांसाठी अन्य आवश्यक त्या सोयीसुविधा उपलब्ध करून देऊन या सर्व किल्ल्यांचे व दुर्गांचे ऐतिहासिक



महत्त्व कायम राखण्याच्या आणि किल्ल्यांची झालेली दुरावस्था थांबविण्याच्या दृष्टीने शासनाने खास उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(५४) "राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांचे वाढते प्रमाण व त्यांच्यात रोजगाराअभावी निर्माण झालेले वैफल्याचे व असंतोषाचे वातावरण लक्षात घेता बेरोजगारांची समस्या परिणामकारक पध्दतीने सोडविण्यासाठी सेवायोजन आणि रोजगार व स्वयंरोजगार कार्यालये अधिक कार्यक्षम करण्यासाठी तसेच संबंधित प्रश्नावर उपाययोजना सुचविण्यासाठी विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहातील सदस्यांची एक संयुक्त समिती स्थापन करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(५५) "शेतकऱ्यांना शेती व्यवसायासाठी लागणारी रासायनिक खते, अवजारे, किटकनाशक यांच्या किंमतीमध्ये सतत होणारी वाढ, तसेच शेतकऱ्यांना शेतमालाचे न परवडणारे भाव विचारात घेता, उत्पादन खर्चावर आधारित असे शेतमालाचे भाव शेतकऱ्यांना मिळण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घ्यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(५६) "राज्यात दिवसेंदिवस वाढत चाललेली महागाई तसेच सेवायोजन कार्यालयात नाव नोंदणी करुनही सुशिक्षित बेरोजगारांना नोकरीची संधी प्राप्त होत नाहीत, सेवायोजन कार्यालयाकडून नोकरीसाठी मुलाखतपत्रही प्राप्त होत नाहीत, परिणामी बेरोजगारांना चरितार्थासाठी कोणतेही साधन उपलब्ध न झाल्याने चरितार्थ चालविणे जिकरीचे झाले आहे, म्हणून पदवी शिक्षण पूर्ण झाल्यानंतर पूढील ३ वर्षात नोकरी न मिळालेल्या बेरोजगारांना आर्थिक मदत म्हणून प्रतिमाह रुपये २५००/- बेकारी भत्ता देण्यात यावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

**श्री. अंबादास दानवे वि.प.स. यांचे ठराव क्रमांक ५७, ५८, ५९, ६० व ६१**

(५७) "राज्यात क्रीडा क्षेत्राचा सर्वांगीण विकास होण्याकरिता तसेच दर्जेदार खेळाडू तयार करण्यासाठी तालुकास्तरावर क्रीडा प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्यात यावीत, त्यासाठी प्रशिक्षित मार्गदर्शक नेमण्यात यावेत, अशा केंद्रांना अद्ययावत साहित्य व आर्थिक सहाय्य देण्यात यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(५८) “शेतकऱ्यांना शेती व्यवसायासाठी लागणारी रासायनिक खते अवजारे, कीटकनाशके यांच्या किंमतीमध्ये सतत होणारी वाढ तसेच शेतकऱ्यांना शेतीमालाचे न परवडणारे भाव विचारात घेता उत्पादन खर्चावर आधारित असे शेतीमालाचे भाव शेतकऱ्यांना मिळण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घ्यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.”

(५९) “राज्यात विशेषतः मराठवाड्यात सतत निर्माण होणारा भीषण दुष्काळ आणि तीव्र पाणी टंचाईची परिस्थिती लक्षात घेता दुष्काळ निवारणार्थ करावयाच्या कायमस्वरुपी उपाययोजना, मराठवाड्यात शाश्वत शेतीसाठी सिंचन अभियान सुरू करून मराठवाड्यातील सिंचनाचा जलआराखडा तयार करून त्याची अंमलबजावणी करण्यासाठी मराठवाड्यासाठी सक्षम जल आयुक्तालय सुरू करावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.”

(६०) “राज्यात अत्यल्प व अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या शेतीतील विहिरी व विद्युत पंपाचा मोठ्या प्रमाणात राहिलेला अनुशेष, विद्युत कनेक्शन मिळण्याकरिता होणारा विलंब, त्यामुळे विद्युत पंपावर घेतलेल्या कर्जाचा वाढत असलेला आर्थिक बोजा, शेतात राबविल्या जाणाऱ्या फळबाग विकास योजनांचे पाण्याअभावी होणारे नुकसान टाळण्याच्या दृष्टीने व उक्त योजनेची अंमलबजावणी परिणामकारकरित्या करण्यासाठी शासनाने धोरणात्मक कार्यक्रम राबवावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करित आहे.”

(६१) “शेतीची नापिकी, अतिवृष्टी, जलप्रकोप, दुबार पेरणी, तिबार पेरणी, ओला व कोरडा दुष्काळ असा असूनही पीक विमा नुकसानभरपाई पासून आणेवारी व उंबरडा उत्पन्नाचा जाचक निकषामुळे शेतकरी वंचित राहत असणे, याला शंभर वर्ष जुनी ब्रिटिशकालीन आणेवारी व उंबरठा काढण्याचे निकष तयार करण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घ्यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.

**श्री. विक्रम काळे वि.प.स. यांचे ठराव क्रमांक ६२, ६३, ६४, ६५ व ६६**

(६२) “राज्यात मोठ्या प्रमाणात वाढणारी वाहनांची संख्या, दैनंदिन अपघातांचे वाढते प्रमाण, त्यामुळे होणारी जीवितहानी हे टाळण्यासाठी तसेच वेळ व इंधनाची बचत आणि विकासाच्या दृष्टीने राज्यातील सर्व राष्ट्रीय व राज्यमार्ग तसेच जिल्ह्या-जिल्ह्याला जोडणारे रस्ते हे चौपदरी करावेत, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.”



(६३) “राज्यात महिला व बालविकास विभागामार्फत चालविण्यात येणाऱ्या शेकडो वसतिगृहात निवास करून अध्ययन करीत असलेल्या हजारो विद्यार्थ्यांना दर्जात्मक शिक्षण, सकस आहार व आरोग्यविषयक सुविधा मिळत नसल्यामुळे त्यांचा शारीरिक व बौद्धिक विकास खुंटत आहे, या विद्यार्थ्यांना आवश्यक त्या परिपूर्ण सुविधा मिळण्यासाठी शासनाने कालबद्ध कार्यक्रम आखावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.”

(६४) “राज्यातील बहुसंख्य गावात विशेषतः उन्हाळ्यात पिण्याच्या पाण्याची भासत असलेली भीषण पाणीटंचाई, विविध कारणांमुळे बंद पडलेल्या अनेक पाणीपुरवठा योजना व त्यांच्या देखभालीत होणारी कुचराई, परिणामी ग्रामीण जनतेचे पिण्याच्या पाण्यासाठी होणारे हाल विचारात घेता पाणीटंचाई कायमस्वरुपी कमी करण्यासाठी शासनाने एक खास कार्यक्रम आखावा व त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.”

(६५) “राज्यातील विनाअनुदान तत्वावरील प्राथमिक, माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांना अनुदानाअभावी प्रयोगशाळा, ग्रंथालये व इतर शैक्षणिक सोयी सुविधा उपलब्ध होऊ शकत नाही, त्यामुळे विद्यार्थ्यांच्या प्रगतीवर होणारा विपरित परिणाम विचारात घेता विनाअनुदान तत्वावरील राज्यातील सर्व प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमध्ये विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये यासाठी शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या भरती तसेच विविध आवश्यक सोयीसुविधा उपलब्ध होण्यासाठी सर्व माध्यमिक शाळांना चालू शैक्षणिक वर्षापासून १०० टक्के अनुदान देण्यात यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.”

(६६) “राज्यातील सर्व विद्यार्थ्यांना घ्यावयाचे सर्व माध्यमातील शिक्षण हे अधिक परिणामकारक, प्रभावी होण्यासाठी आणि भविष्यात सक्षम पिढी उभी राहण्यासाठी सर्व शिक्षण विभाग (शालेय शिक्षण, उच्च शिक्षण, तंत्रशिक्षण, आश्रमशाळा, अंध, अपंग, मूक-बधिर शाळा, आदिवासी आश्रम शाळा) हे मंत्रालयातील एकाच विभागाच्या अधिपत्याखाली आणावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.”

**श्री. गोपिचंद पडळकर, वि.प.स. यांचे ठराव क्रमांक ६७, ६९, ७० व ७१**

(६७) "देशाला उद्योगाच्या माध्यमातून विकास व प्रगतीच्या मार्गावर नेऊन जगभर समाज सेवेचा ठसा उमटवणाऱ्या लोकप्रिय उद्योगपती श्री.रतनजी टाटा यांना "भारतरत्न पुरस्कार" देण्यात यावा, अशी शिफारस विनाविलंब केंद्र शासनाकडे करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(६९) "महाप्रतापी नोवसाजी नाईक आणि सहकारी वीर योद्ध्यांची सेना पिकवणारी जमीन असलेली ४० पेक्षा अधिक गावेही अप्पर पैनगंगा प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रात नष्ट झाली तसेच कळमनुरी विधानसभेचे चार वेळा आमदार राहिलेले स्व. विठ्ठलराव नाईक हे देखील नोवसाजी नाईक यांच्या वंशातील एक होते. त्यांनी स्वातंत्र्यलढ्यात आणि धरणग्रस्तांचे पुनर्वसन करण्यासाठी मोठा संघर्ष केला होता. लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांसाठी केलेला त्याग विचारात घेऊन बुडीत क्षेत्रात गेलेल्या मौल्यवान जमिनी, ऐतिहासिक गढ्या वाडे यांचे स्मरण राहावे म्हणून 'आद्य क्रांतिवीर राजे नोवसाजी नाईक जलाशय' असे नाव पैनगंगा प्रकल्पास देण्याची शिफारस ही विधानपरिषद शासनास करत आहे."

(७०) "देशातलं सांस्कृतिक वैभव टिकून आहे त्यात हिंदू राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी यांचा मोठा वाटा आहे, त्यांची कर्मभूमी अखंड हिंदुस्तान आहे. त्यांचा जन्म अहमदनगर जिल्ह्यातील चौंडी या गावी झालेला आहे, हिंदुस्थानच्या प्रेरणास्थान राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जाज्वल्यपूर्ण इतिहासाचे स्मरण राहण्याकरिता अहमदनगर जिल्ह्याचे नाव बदलून 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी नगर' करण्यात यावे अशी लोकभावना आहे, पुण्यश्लोक अहिल्यादेवींच्या नावे असणारा हिंदुस्थानातला पहिला जिल्हा महाराष्ट्रात असेल ही बाब आपल्या सर्वांसाठी अभिमानास्पद असणार आहे, त्यामुळे अहमदनगरचे नामांतर करून 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी नगर' करण्याची शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(७१) "साखर कारखानदारी मध्ये पारदर्शकता येण्याच्या व स्पर्धात्मक दृष्टिकोनातून दोन साखर कारखान्यांमधील २५ किलोमीटर अंतराची अट शिथिल करण्याची मागणी राज्यातील शेतकरी व शेतकरी संघटना अनेक वर्षा पासून करीत आहे, उक्त मागणीच्या अनुषंगाने दोन साखर



कारखान्यांमधील २५ किलोमीटरच्या अंतराची अट शिथिल करण्याबाबत तसेच राज्यातील शेतकरी ऊस ज्या कारखान्याला देतात त्या कारखान्यांकडून त्यांना सभासदत्व देण्यात येत नाही त्या शेतकऱ्यांना कारखान्याकडून सभासदत्व देण्यात यावे अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

**श्री. शशिकांत शिंदे, वि.प.स. यांचे ठराव क्रमांक ७२, ७३, ७५ व ७६**

(७२) "राज्यांत दिवसेंदिवस वाढत चाललेली महागाई तसेच सेवायोजन कार्यालयात नाव नोंदणी करुनही सुशिक्षित बेरोजगारांना नोकरीची संधी प्राप्त होत नाहीत, सेवायोजन कार्यालयाकडून नोकरीसाठी मुलाखतपत्रही प्राप्त होत नाहीत, परिणामी बेरोजगारांना चरितार्थासाठी कोणतेही साधन उपलब्ध न झाल्याने चरितार्थ चालविणे जिकरीचे झाले आहे, म्हणून पदवी शिक्षण पूर्ण झाल्यानंतर पूढील ३ वर्षात नोकरी न मिळालेल्या बेरोजगारांना आर्थिक मदत म्हणून प्रतिमाह रुपये २५००/- बेकारी भत्ता देण्यात यावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(७३) "केंद्र शासनाने राज्यात मुख्य रस्त्यापासून खेडे गावांना जोडण्याकरिता पंतप्रधान ग्रामसडक योजना अंमलात आणलेली आहे. त्याच धर्तीवर राज्यात पांदण रस्ता दुरुस्ती व मुख्यमंत्री सडक योजना राज्य शासनाने सुरु कराव्यात, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(७५) "राज्यात पिण्याच्या पाण्याची निर्माण झालेली व बिकट होत असलेली समस्या लक्षात घेता पिण्याच्या पाण्याचा प्रश्न प्रभावीरित्या सोडविण्यासाठी धरण, तलाव व भूगर्भातील जलसाठ्यांचा नियोजनपूर्वक वापर करण्याच्या दृष्टीने शासनाने एक खास कार्यक्रम आखावा व त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(७६) "शेतकऱ्यांना शेती व्यवसायासाठी लागणारी रासायनिक खते, अवजारे, किटकनाशक यांच्या किंमतीमध्ये सतत होणारी वाढ, तसेच शेतकऱ्यांना शेतमालाचे न परवडणारे भाव विचारात घेता, उत्पादन खर्चावर आधारित असे शेतमालाचे भाव शेतकऱ्यांना मिळण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घ्यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

**श्री. सत्यजित तांबे, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक ७८**

(७८) "शासनातर्फे राज्यातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शाळा व महाविद्यालयामार्फत शिष्यवृत्ती व शुल्क सवलत दिली जाते, त्याच धर्तीवर राज्यातील अल्पभूधारक शेतकरी कुटूंबातील पाल्यांना शाळा व महाविद्यालयांमार्फत शिष्यवृत्ती व शुल्क सवलत देण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

**एकवीस :** सर्वसाधारण सार्वजनिक हितसंबंधाच्या बाबींवर चर्चा.

**बावीस :** सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेली कागदपत्रे (यादी अंतिम कार्यावली सोबत जोडण्यात येईल.)

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक २६ फेब्रुवारी, २०२३.

**राजेन्द्र भागवत,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई